**वाचा :-**

१. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना जूलै २०१३ अन्वये.
२. संचालक,राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण महाराष्ट्र राज्य,सिडको भवन, ४ था मजला, दक्षिण कक्ष, बेलापुर नवी मुंबई यांचे पत्र क्र.जा.क्र.ग्रा.गृह.क./सांखिकी/उदिष्ट २०१९-२०/३३८/ २०१९ दिनांक २३/०५/२०१९.
३. या कार्यालयाचे पत्र क्र. जिग्राविय/वा/अभि/७५६/१९ दिनांक २४/०५/२०१९.
४. संचालक,राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण महाराष्ट्र राज्य,सिडको भवन, ४ था मजला, दक्षिण कक्ष, बेलापुर नवी मुंबई यांचे पत्र क्र.जा.क्र.ग्रा.गृह.क./सांखिकी/उदिष्ट २०१९-२०/३५८/ २०१९ दिनांक २४/०५/२०१९.
५. या कार्यालयाचे पत्र क्र.११६३ दिनांक १५/०७/२०१४.
६. गट विकास अधिकारी पंचायत समिति कारंजा यांचे पत्र क्र. जा.क्र/पस/बांध/कअ/१६०५/२०१९ दि.१४/०६/२०१९.

---

**प्रशासकिय मंजुरी आदेश**

**प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण सन २०१९-२०**

जा.क्र.जिग्राविय/अभि.शाखा /प्रमआयो/ 816 /२०१९-२०
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वाशिम
दिनांक : 18/06/19

संदर्भ क्रमांक १, २ व ३ च्या अनुषंगाने, प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण च्या मार्गदर्शक सूचना व विहीत निकषाप्रमाणे गट विकास अधिकारी पंचायत समिति कारंजा यांचेकडून प्राप्त अनुसुचित जाती/जमाती,अल्पसंख्याक व इतर व अपंग लाभार्थींची ऑनलाईन प्राप्त कायमस्वरुपी प्राधान्यक्रम (प्रपत्र ब) यादीच्या आधारे कायम प्रतिक्षा यादीतील ग्रामसभेने निवड केलेल्या लाभार्थ्यांचे नाव तपासणी करुन घरकुल मंजुरीसाठी मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत संदर्भिय क्र.०२ व ०४ अन्वये वाशिम जिल्हयास एकुण १४३९ घरकुलांचे उदिष्ट प्राप्त आहे त्या अनुषंगाने संदर्भिय क्र.५ अन्वये पंचायत समिति कारंजा ला अनुसूचित जाती ५९,अनु जमाती ५८, अल्पसंख्यांक ०, इतर २७७ असे एकूण ३९४ घरकुलांचे उदिष्ट वाटप करण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने विहीत केलेल्या उद्दीष्टांप्रमाणे पंचायत समिति कारंजा यांचेकडून संदर्भ क्रमाक ०६ अन्वये प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत प्राप्त प्रस्तावास खालील यादीमध्ये दर्शविलेल्या **एकुण १९** पात्र लाभार्थ्यांच्या घरकुल मंजुरीच्या प्रस्तावास खालील अटी व शर्थीस अधीन राहून प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

| तालुका | देण्यात आलेली एकुण उद्दीष्ट संख्या | | | | | | याआधी देण्यात आलेली प्रशासकीय मंजुरी प्रस्ताव संख्या | | | | | | आता या आदेशाव्दारे देण्यात आलेली प्रशासकीय मंजुरी प्रस्ताव संख्या | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अनु. जाती | अनु. जमाती | अल्प. | इतर | अपंग | एकुण | अनु. जाती | अनु. जमाती | अल्प | इतर | अपंग | एकुण | अनु. जाती | अनु. जमाती | अल्प | इतर | अपंग | एकुण | |
| कारंजा | ५९ | ५८ | ० | २७७ | - | ३९४ | ३१ | १६ | ० | २४१ | ० | २८८ | ० | ० | ० | १९ | ० | १९ | ३०७ |

एकुण १९ लाभार्थ्यांची यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | लाभार्थीचे नांव | गाव | PMAY-G ID क्रमांक | प्राधान्य क्रमांक | प्रवर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मंगला भवन मंगुलकर | झोडगा | MH2848707 | १ | इतर | |
| २. | मैनाबाई सुर्यभान मंगुलकर | झोडगा | MH2848708 | २ | इतर | |
| ३. | छबुताई पुरुषोत्तम इंगळे | झोडगा | MH1211735 | ३ | इतर | |
| ४. | मंदा रमेश ताथोडकर | पलाना | MH1009276 | १ | इतर | |
| ५. | प्रभावती अर्जुन सातपुते | पलाना | MH1185807 | ३ | इतर | |
| ६. | दुर्गा महादेव देवकर | पलाना | MH1395885 | ५ | इतर | |
| ७. | लता गजानन चव्हाण | लोहगाव | MH2496700 | ३ | इतर | |
| ८. | अर्चना सुनिल राठोड | लोहगाव | MH2496717 | ४ | इतर | |
| ९. | मंदा पुरुषोत्तम घोडसाड | काकडशिवणी | MH1339151 | १७ | इतर | |
| १०. | रंजना देवराव वरघट | काकडशिवणी | MH2441511 | १९ | इतर | |
| ११. | पांडुरंग केजान भांडे | वढवी | MH2454137 | ५६ | इतर | |
| १२. | डि.बी.पवार | लोहारा | MH2523945 | ४८ | इतर | |
| १३. | आर.आर. जाधव | लोहारा | MH2523990 | ५६ | इतर | |
| १४. | उषा प्रकाश सावळे | लोहारा | MH2792959 | ७४ | इतर | |
| १५. | एस.एफ. मावले | लोहारा | MH2792963 | ७६ | इतर | |
| १६. | यु. आर. पवार | किनखेड | MH1026433 | ०२ | इतर | |

प्रकल्प संचालक
जि. प्रा. वि. यं. वाशीम

Scanned by CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १७. | अनिल उत्तमराव राठोड | किनखेड | MH1033889 | ०४ | इतर | |
| १८. | बळीराम लक्ष्मण राठोड | किनखेड | MH1311791 | ०५ | इतर | |
| १९. | शंकर तुळशिराम कदम | लोहारा | MH1094392 | ०३ | इतर | |

वरील प्रमाणे **एकुण १९** घरकुलांच्या प्रस्तावांना शासकिय निकषानुसार प्रती घरकुल रू.१२००००/- (अक्षरी रुपये एक लक्ष विस हजार फक्त) प्रमाणे खालील अटी व शर्तीवर प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

१. सदरहू मंजुरी ही गट विकास अधिकारी पंचायत समिति कारंजा यांनी सादर केलेल्या यादीवरुन देण्यात येत असुन यामध्ये काही चुक,तक्रारी व अनियमितता आढळल्यास सर्वस्वी जबाबदारी गट विकास अधिकारी पंचायत समिति यांची राहील. घरकुलाचे प्रस्तावांना मंजुरी देतांना गट विकास अधिकारी यांच्याकडुन प्राप्त यादीप्रमाणे मंजुरी दिलेली असली तरी शासनाच्या सुचनेनुसार घरकुल हे पती व पत्नी यांच्यासंयुक्त नावानेच किंवा महिलेच्या नावाने द्यावयाचे असुन त्याप्रमाणे गट विकास अधिकारी यांनी कार्यवाही करावयाची आहे.

२. सोबतचे मंजुर लाभार्थी शासन मार्गदर्शक सुचनेनुसार व प्रपत्र ब च्या कायमस्वरुपी प्रतिक्षा यादी प्रमाणे लाभ देण्यास पात्र असल्याची गट विकास अधिकारी यांनी खातरजमा केल्याचे गृहित धरून मान्यता देण्यात येत आहे. याबाबत पुन्हा योग्य ती खातरजमा करण्यात यावी. मंजुर लाभार्थीच्या याद्या संबधीत ग्राम पंचायतीच्या नोटीस बोर्डावर लावण्याच्या सूचना संबधीत ग्राम पंचायतीस द्याव्यात.अपात्र लाभार्थीस घरकुल दिले जाणार नाही. याची आवश्यक ती खबरदारी गट विकास अधिकारी यांनी करून घ्यावयाची आहे.तसेच गविअ व अभियंता यांनी मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करावी.

३. प्रत्येक घरकुलासाठी रू.१२००००/- अक्षरी रुपये एक लक्ष विस हजार फक्त प्रमाणे अनुदान उपलब्ध करून दिले जाणार आहे. सदरची कार्यवाही PFMS कार्यपध्दतीने करण्यात येते. पंचायत समितीस्तवरावर सदरची रक्कम टप्पानिहाय लाभार्थ्याच्या खातेमध्ये जमा करण्यात येणार आहेत. घराचा वापर स्वतःच्या कुटुंबासाठीच केला जाईल, घरभाडयाने देणे, विकणे, दुसऱ्यास वापरण्यास देणे याबाबी करता येणार नाही. अशा बाबी आढळल्यास संबधीत लाभार्थीस घराचा ताबा ग्राम पंचायतीकडे द्यावा लागेल व कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, अशास्वरूपाचे प्रतीज्ञापत्र लाभार्थ्याकडून तात्काळ घेण्यात यावे. घरकुलाचे बांधकाम टिकावू स्वरूपाचे, चांगल्या प्रतीचे व लाभार्थीच्या आवश्यक व निकडीनुसार होण्याच्या दृष्टीने लाभार्थी कुटुंबाचा सहभाग सुरवातीपासुन घेण्यात यावा. लाभार्थीने स्वतः काम हाती घेवून दिनांक ३१ डिसेंबर २०१९ पुर्वी पुर्ण करावे.

४. प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण व महात्मा गांधी रोजगार हमी योजनेचे अभिसरण पुर्ण करण्यात यावे. मगांरोहयो अंतर्गत टप्पेनिहाय अनुदान लाभाधारकास देण्यात यावे.

५. घरकुलाचे बांधकाम लाभार्थी कुटुंबाच्या सहभागाने असतांना त्यामध्ये खालील प्रमुख बाबींचा समावेश राहील,याची खबरदारी गट विकास अधिकारी यांनी घ्यावयाची आहे.

६. सदर मंजुर घरकुलांची नोंद आवासॉफ्टमध्ये घेणे आवश्यक आहे.तसेच लाभार्थ्यास प्रथम व्दितिय व त्रितिय हप्ता दिल्यानंतर तसेच बांधकाम पुर्ण होईपर्यत आवासॉफ्टमध्ये नोंद करणे आवश्यक आहे.

७. घरकुलाचे क्षेत्रफळ २६९ चौ.फुटापेक्षा कमी असता कामा नये. प्रत्येक घरकुलासाठी २ खोल्या असाव्यात.

८. प्रत्येक घरकुलासाठी शौचालय बंधनकारक आहे.शौचालय बांधण्याची खबरदारी गट विकास अधिकारी यांनी घ्यावयाची असुन त्या शिवाय घरकुल पुर्ण झाले, असे म्हणता येणार नाही.त्यामुळे गट विकास अधिकारी यांनी निधी वितरीत करतांना आवश्यक ती खबरदारी घेवून प्रत्येक घरकुलास शौचालय बांधले जाईल,असे पाहावे.

९. वरील बाबी शिवाय प्रत्येक घरकुलाची किंवा समुहाची गरज /निकड विचारात घेवून त्यानुसार परिसर सुधारणा किंवा मुलभुत सुविधा पुरविण्यात याव्यात. यामध्ये प्रामुख्याने रस्ते, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सांडपाण्याची व्यवस्था, घरभोवती वृक्ष लागवड, घरासमोर आंगण, इलेक्ट्रिफिकेशन, न्हाणीघर इत्यादी सोई पुरविण्याकडे लक्ष द्यावे.यासाठी वेळोवेळी शासनाने या योजनेअंतर्गत दिलेल्या सूचना विचारात घेण्यात याव्यात.

१०. घरकुलाचे काम पुर्ण होताच त्या ठिकाणी प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण सन २०१९-२० असा फलक / लोगो लावण्यात यावा.

११. लाभार्थीने हाती घेतलेले काम याबाबत झालेल्या कामाचे मुल्यांकण दाखले प्राप्त करून घेवून या कार्यालयाने विहीत केलेल्या टप्यानुसार अनुदान वितरीत करण्यात यावे.

१२. घरकुलाचे काम चालु असतांना योजनेच्या नियमावली नुसार आवश्यक ते सर्व रेकॉर्ड नोंदी ठेवण्याची जबाबदारी संबधीत यंत्रणेची राहील.

१३. घरकुलाचे काम पुर्ण होताच ते लाभार्थी कुटुंबाच्या ताब्यात देवून त्याची ताबेपावती घेण्यात यावी. त्याच प्रमाणे वरील अट क्र.१ मध्ये नमुद केल्या प्रमाणे ताबे पावती महिला / पती पत्नी च्या संयुक्त नावानेच घ्यावी आणि त्यानुसारच संबधीत ग्राम पंचायतीच्या नमुना ८ मध्ये नोंद घेण्याच्या सूचना ग्राम पंचायतीना द्याव्यात. या संबधीची जबाबदारी तालुका पातळीवर विस्तार अधिकारी (ग्रा.प.) यांच्यावर सोपवावी. त्यांनी तालुका पातळीवर घरकुल मंजुर / ताबे पावत्या इत्यादी बाबत वर्षनिहाय अद्यावत नोंदवही ठेवावी.

**प्रकल्प संचालक**

Scanned by CamScanner

१४. योजने अंतर्गत घरकुलांच्या बांधकामाची तांत्रिक जबाबदारी जिल्हा पातळीवर कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग जिल्हा परिषद वाशिम यांची व त्यांच्या मार्गदशनाखाली तालुका पातळीवर उप अभियंता बांधकाम विभाग यांची राहील. त्यांनी गट विकास अधिकारी यांच्या सल्याने त्यांच्या अखत्यारातील शाखा/कनिष्ठ अभियंता यांना आवश्यक त्या सूचना देवून लाभार्थी कुटुंबास तांत्रिक सल्ला देवून मार्गदर्शन करावे आणि वेळेच्यावेळी घरकुलांच्या कामाचे मोजमाप व प्रगती अहवाल गट विकास अधिकारी यांच्या मार्फत सादर करावेत.

१५. वरील प्रमाणे सर्व अटी / शर्तीच्या अधीन राहुन सर्व कामे संबधीत लाभार्थीच्या सहभागाने तात्काळ सुरू करण्यात यावीत व तसा अहवाल विहीत नमुन्यात सादर करावा.

१६. एखादया लाभार्थ्यास शासनाच्या इतर कोणत्याही योजनेखाली घरकुल योजनेचा लाभ मिळाल्यास त्यास पुन्हा लाभ देता येणार नाही.

१७. एखादया लाभार्थ्याचे पक्के घर असल्याचे पुरावे उपलब्ध झाल्यास त्यास या योजनेखाली लाभ देऊ नये,त्याचे नाव प्रतिक्षा यादीतुन वगळण्यात यावे.

१८. एकदा लाभ दिल्यानंतर त्या लाभदारास दुस-यांदा लाभ देऊ नये,असे आढळल्यास सर्वस्वी जबाबदारी गट विकास अधिकारी/ग्रामसेवक यांची राहिल.

१९. पुढील प्रमाणे प्राधान्य देणे. अ) मुक्त वेठबिगार ब) घरातील प्रमुख विधवा स्त्री, घटस्फोटीत, कुमारीका, नैसर्गिक आपत्तीमुळे बाधीत कुटूंब, जातीय भेदामुळे पिडीत, अपंग कुटूंब प्रमुख.

२०. सदर मंजुराती मध्ये किरकोळ नावात बदल असल्यास किंवा लाभार्थी मय्यत असल्यास त्याच्या पत्नीच्या नावे मान्यता देण्याकरीता/नावात बदल करण्यासाठी या कार्यालयास प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील. या मध्ये कोणतीही अनियमीतता होणार नाही याची गांर्भियाने नोंद घ्यावी. यामध्ये चुकीचा प्रस्ताव सादर करु नये.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
जिल्हा परिषद वाशिम तथा
कार्यकारी अध्यक्ष
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
वाशिम

प्रति,

गट विकास अधिकारी
पंचायत समिती कारंजा

प्रत :- माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

१. कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग जिल्हा परिषद वाशिम.
२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) जिल्हा परिषद वाशिम.
३. प्रकल्प अधिकारी एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला
४. जिल्हा समाजकल्याण अधिकारी (प्रथम श्रेणी) वाशिम.
५. उप अभियंता उप विभाग, पंचायत समिती कारंजा
६. लेखाअधिकारी जि.ग्रा.वि.य. वाशिम.
७. सहाय्यक लेखाअधिकारी पंचायत समिती कारंजा

18/06/19

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
जिल्हा परिषद वाशिम तथा
कार्यकारी अध्यक्ष
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
वाशिम

**प्रकल्प संचालक**
**जि. ग्रा. वि. यं. वाशीम.**

Scanned by CamScanner